# मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान

**विलास गायकवाड**

रिसर्च स्कॉलर,मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259676

## ABSTRACT:

मराठी साहित्य हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय जीवनाचे प्रतिबिंब आहे. मध्यकाळापासून (संतपंततंत) ते आधुनिक काळापर्यंत कथा, कादंबरी, काव्य, नाटक, चरित्रआत्मचरित्र, प्रवासवर्णन या ललित लेखनाचा समावेश होतो. यात पुन्हा मराठी वाङ्मयातील वेगवेगळे प्रवाह येतात. त्यात दलित, ग्रामीण,आदिवासी, स्त्रीवादी, ख्रिस्ती, मुस्लिम, भटक्या विमुक्तांचे साहित्य, जनसाहित्य, बालसाहित्य, विज्ञान, अनुवादित साहित्य, कामगार साहित्य आदींचा समावेश होतो. एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे साहित्यनिर्मिती, वाचन, प्रसार आणि अभिव्यक्तीच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाला. मराठी साहित्येतिहास समृद्ध असून त्यात सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिकतेचे सुंदर चित्रण येते. तंत्रज्ञानाचा वेगाने झालेला विकास साहित्यविश्वालाही मोठ्या प्रमाणात प्रभावित करतो आहे. इंटरनेट, सोशल मीडिया, ईपुस्तके, पॉडकास्ट्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांसारख्या साधनांमुळे साहित्याचा प्रसार आणि निर्मिती या दोन्ही पातळ्यांवर क्रांती घडली आहे. लेखक आता ब्लॉग, यूट्यूब चॅनेल्स व ऑडिओबुक्सद्वारे वाचकांशी थेट संवाद साधत आहेत. पारंपरिक छापील पुस्तकांसोबतच डिजिटल स्वरूपातील साहित्य अधिक सहज उपलब्ध होत आहे. तसेच, नवोदित लेखकांसाठीही लेखन व प्रसिद्धीचे दरवाजे खुले झाले आहेत. मराठी भाषा आणि साहित्याचे डिजिटायझेशन सुरू असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि अनुवाद साधनांनी जागतिक पातळीवर पोहोचण्याची क्षमता वाढली आहे. तथापि, या तंत्रज्ञानाच्या वापरात साहित्यिक गुणवत्ता आणि मौलिकतेचे जतन काळाची गरज आहे. त्यामुळे मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा समन्वय साधताना संतुलन राखणे आवश्यक आहे. या बदलांचा योग्य वापर केल्यास मराठी साहित्याला एक नवीन आयाम मिळू शकतो. या शोधनिबंधात आपण मराठी साहित्याच्या ऐतिहासिक प्रवासाचा आढावा घेऊन आधुनिक तंत्रज्ञानामुळे झालेल्या बदलांवर प्रकाश टाकला आहे.

**KEYWORDS:**
मध्ययुगीन-आधुनिक मराठी साहित्य, साहित्य प्रवाह, आधुनिक तंत्रज्ञान सोशल मीडिया, ईपुस्तके, कृत्रिम बुद्धिमत्ता.

## पारंपरिक मराठी साहित्य:

मराठी भाषेचा उदय आपणाला अगदी सातव्या शतकापर्यंत शोधता येतो. त्याचे उदाहरण म्हणून हल राजाच्या गाथासप्तशतीचे सांगता येते. तसेच विविध शिलालेख व ताम्रपत्रांचाही महत्त्वपूर्ण पुरावा आहे. सातव्या शतकात गाथासप्तशती मराठी भाषेतील महत्त्वाचा संदर्भ आहे. मराठी भाषेचे विकसित स्वरूप जरी तेराव्या शतकात दिसत असले तरी त्याची सुरुवात अगदी त्यापूर्वीच झाली होती हे सिद्ध होते. तेराव्या ते सतराव्या शतकात संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत नामदेव, संत जनाबाई, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत चोखामेळा, संत एकनाथ, तुकाराम यांसारख्या संत कवींनी भक्ती आणि समाजप्रबोधनाचे कार्य केले. महानुभाव पंथातील म्हाइंभट, महदंबा, साती ग्रंथांचे कर्ते यांचा नामोल्लेख करावाच लागतो. मध्ययुगीन कालखंडात मोरोपंत, श्रीधर पंडित, वामन पंडित, रघुनाथ पंडित, सामराज, मुक्तेश्वर आदी आणि राम जोशी, होनाजी बाळा, अनंत फ़ंदी, सगनभाऊ या शाहिरांनी मराठी साहित्याला समृद्ध केले. आधुनिक कालखंडात अण्णा भाऊ साठे, पु. भा. भावे, जी. ए. कुलकर्णी, वि.स.खांडेकर, पु.ल. देशपांडे, प्र.के. अत्रे, द.मा. मिरासदार, चिं. वि.जोशी, वि. वा. शिरवाडकर, ना.सी. फडके, रणजित देसाई, ग.दि. माडगूळकर, साने गुरुजी, भा.रा. भागवत, जयंत नारळीकर, व.पु. काळे, राम गणेश गडकरी, विजय तेंडुलकर, चिं. त्र्यं. खानोलकर, शं. ना. नवरे, विश्वास पाटील, शांता शेळके, दुर्गा भागवत, लक्ष्मण देशपांडे, इंदिरा संत, अनिल अवचट, मिलिंद बोकील, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, शंकरराव खरात, यशवंत मनोहर, वामन होवाळ, योगीराज बागूल, वासुदेव मुलाटे, रा.र. बोराडे, शिवाजी सावंत, दया पवार, शरणकुमार लिंबाळे, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, ताराबाई शिंदे, विभावरी शिरूरकर, लक्ष्मीबाई टिळक, कुमुद पावडे, बेबी कांबळे, गौरी देशपांडे, मंगला गोडबोले ही साहित्यिकांची प्रातिनिधिक नावे आहेत. अलीकडे नव्या पिढीच्या

कवीलेखकांनी साहित्यात भर घालून साहित्याला उंचीवर नेण्याचे कार्य केले आहे. या लेखकलेखिकांनी आपल्या साहित्यकृतीद्वारे समाजाचे विविध पैलू उलगडून दाखविले आहे. तर महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे,,लोकहितवादी, आगरकर यांसारख्या सुधारकांनी सामाजिक विषमतेविरुद्ध लेखन करून समाजाला जागृत केले. हे सर्व साहित्य वाचकांपर्यंत पोहोचण्याचे माध्यम होते मासिके, दिवाळी अंक, ग्रंथालये आणि पुस्तक प्रदर्शने.

## साहित्यात उपयोजन

आधुनिक तंत्रज्ञान म्हणजे संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सोशल मीडिया, डिजिटल प्रकाशन इत्यादींचा समावेश. हे तंत्रज्ञान केवळ माहितीच्या प्रसारासाठीच नाही, तर साहित्यनिर्मिती आणि अभिव्यक्तीसाठीही प्रभावी ठरले आहे. हे माध्यम कोणतीही माहिती क्षणात जगात वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे विलक्षण कार्य करते. यामुळे आपल्याला जे पुस्तक हवे आहे त्यासाठी प्रतीक्षा करावी लागत नाही. एवढेच नाहीतर प्रकाशित पुस्तकातील जो भाग आपल्याला हवा किंवा जो घटक हवा आहे तेवढाच भाग वाचता येतो. यात विषयाचे कोणतेही बंधन राहत नाही.

## १. साहित्यनिर्मितीतील बदल

अ. डिजिटल लेखन : डिजिटल लेखनामुळे विविध गोष्टी सोप्या झाल्या आहेत. यामध्ये लेखकाला आता संगणक, लॅपटॉप, टॅब आणि मोबाइलवर लिहिता येते. आपण कुठेही असलो तरी एखादी घटना आठवली तर ती लगेच मोबाइलवर टाइप करून ठेवता येते आणि नंतर ती आपल्याला हवी त्या ठिकाणी शेअर करता येते किंवा साठवून ठेवता येते. डिजिटलमुळे टायपिंग करणे, संपादन करणे, फॉरमॅटिंग करणे ही सर्व कामे सोपी झाली आहेत. लेखनासाठी मायक्रोसॉफ्ट वर्ड, गुगल डॉक्युमेंट्स, स्क्रीवेनर (Scrivener) यांसारखी अनेक साधने उपयोजिली जातात.

ब. स्वप्रकाशन : लेखकाला पूर्वी आपले पुस्तक प्रकाशित करावयाचे असेल तर प्रकाशकाकडे पाठवावे लागे. त्यानंतर काही दिवसांनी किंवा काही महिन्यांनी प्रकाशक ते प्रकाशित करणार की नाही ते कळवित

असे. कधी काही प्रकाशक पुस्तक छापण्याचा खर्च मागत असत. कधी कधी तर प्रकाशक होकार देऊनही पुस्तक लवकर प्रकाशित करीत नसत. आता मात्र प्रकाशकांवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही. लेखक आता ॲमेझॉन किंडल डायरेक्ट पब्लिशिंग, नोशन प्रेस यांसारख्या प्लॅटफॉर्मवर स्वतःचे पुस्तक प्रकाशित करू शकतात. त्यामुळे लेखकाच्या लिखाणाला न्याय मिळतो.

क. ब्लॉग आणि वेबसाइट्स : लेखकांनी स्वतःचे ब्लॉग तयार करून स्वतःची विचारधारा मांडण्याचा एक मोठा प्लॅटफॉर्म मिळाला आहे. हा प्लॅटफॉर्म त्याला त्याचे म्हणणे मांडण्यासाठी आता कोणाचीही परवानगी घेण्याची गरज उरली नाही. त्याने त्याचे लेखन नियमितपणे रेखांकित करणे सुरू केले आहे. यात लेखकाला विषयाचे कोणतेही बंधन नसते. उदा. मराठीमन, साहित्यसूत्र, कवितेचे घर यांसारख्या ब्लॉग्जवर दर्जेदार साहित्य उपलब्ध आहे. ही एक लेखकासाठी उपलब्धीच होय.

## २. वाचन सवयींत परिवर्तन

अ. ईबुक्स आणि ॲप्स : स्टोरीटेल, बुकगंगा, प्रतिलिपी यांसारख्या ॲप्सवर विविध विषयांवरील अनेक लेखकांची मराठी पुस्तके सहज उपलब्ध आहेत. वाचकाला जे पुस्तक हवे आहे ते तो निवडून आपली वाचनाची भूक भागवू शकतो. याबरोबरच स्पर्धा परीक्षार्थी स्पर्धेची पुस्तके आणि विद्यार्थी अभ्यासक्रमाची पुस्तकेही ईबुक्क आणि ॲप्सच्या माध्यमातून बघू शकतो. वाचक आता मोबाइलवर, टॅबवर किंवा किंडलवर वाचन करतात, हे विशेष

ब. ऑडिओबुक्स आणि पॉडकास्ट्स : याद्वारे कविता, कथा, कादंबरी, आत्मचरित्रे आदी आता ऐकता येतात. मराठी पॉडकास्ट, कथाकथन यांसारख्या कार्यक्रमांनी वाचनाचा अनुभव बदलला आहे. धार्मिक प्रवचने, भाषणे, व्याख्याने या माध्यमातून ऐकता येतात. काहींना वाचनाचा कंटाळा येत असेल किंवा काहींना अक्षरज्ञान नसेल तर ऑडिओबुक्स आणि पॉडकास्ट्स अत्यंत मदतगार ठरते.

क. सोशल मीडिया : आज सोशल मीडिया हे माध्यम अत्यंत प्रभावी ठरले आहे. त्यामुळे फेसबुकवरील साहित्यिक ग्रूप्स, ट्विटरवरील लघुकथा, इन्स्टाग्रामवरील कवितांचे व्हिज्युअल्स यामुळे वाचन अधिक

संवादात्मक झाले आहे. व्हॉट्सअ‍ॅप्सचाही महत्त्वपूर्ण उपयोग होतो. यात विविध विषयाला स्पर्श केलेला असतो. त्यामुळे आपल्या आवडीनुसार आपल्याला हवे ते वाचन करता येते.

## ३. साहित्याचा प्रसार

अ. ग्रामीण भागाशी नाळ : इंटरनेटमुळे जग एक खेडे बनले आहे. त्यामुळे ग्रामीण भागाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात इंटरनेटचे जाळे विणले गेले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील वाचकही साहित्याशी जोडला गेला आहे. ईपेपर, ऑनलाइन ग्रंथालये, पुस्तके, नियतकालिके, डिजिटल दिवाळी अंक यामुळे साहित्य सर्वदूर पोहोचले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची ही किमया साहित्यासाठी जमेची बाजू ठरली आहे.

ब. लेखकवाचक संवाद : पूर्वी पत्रांद्वारे संवाद होत असत. या प्रक्रियेला खूप विलंब लागत होता. आता मात्र आधुनिक तंत्रज्ञानमुळे ही प्रक्रिया अत्यंत विनाविलंब झाली आहे. लेखकवाचक संवाद साधण्यासाठी आता फेसबुक लाइव्ह, इन्स्टाग्राम, ट्विटर थ्रेड्सने थेट संवाद शक्य झाला आहे.

क. ऑनलाइन चर्चासत्र आणि संमेलने : कोरोना काळात झूम, गुगल मीट यांवर साहित्य संमेलने झाली. आता ही पद्धत अंगवळणी पडली आहे. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे ऑनलाइन घेतली जातात. व्याख्यानेही ऑनलाइन आयोजित केली जातात. पीएच.डी. व्हायव्हा (viva) देखील ऑनलाइन घेतला जातो. एवढेच नव्हे तर विविध कंपनींच्या मुलाखतीही ऑनलाइन घेतल्या जातात. एवढेच नाही तर अलीकडे ऑनलाइन विवाह पार पडला आहे. हे सर्व आधुनिक तंत्रज्ञानाने शक्य झाले आहे.

## ४. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि साहित्य

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि साहित्य यांचा संबंध जितका गुंतागुंतीचा आहे, तितकाच तो रोमांचकही आहे. या दोन्ही क्षेत्रांमध्ये सर्जनशीलता, कल्पकता आणि मानवी अनुभव यांचा गहन संबंध आहे. पण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उदयानंतर साहित्य क्षेत्रात काही नवे प्रवाह निर्माण झाले आहेत.

अ. लेखन सहायक : कृत्रिम बुद्धिमत्ता सहायक म्हणून लेखनात

मदत करतात. विषय सुचवणे, भाषाशैली सुधारणे, अनुवाद करणे हे शक्य झाले आहे.

लेखकाला "ब्लॉग" आला की काय लिहायचं हे सुचत नाही. अशा वेळी AI विविध विषयांवर कल्पना, शीर्षकं, रूपरेखा सुचवतो. लेखनातील चुका शोधून त्यावर सुधारणा सुचवतो. लेखन अधिक स्पष्ट आणि वाचनीय बनवतो. विविध स्रोतांमधून माहिती गोळा करून संक्षिप्त स्वरूपात सादर करतो, ज्यामुळे लेखन अधिक माहितीपूर्ण आणि विश्वासार्ह बनतं. AI लेखन सहायक म्हणून काम करताना अनेक पातळ्यांवर तुमचं लेखन अधिक प्रभावी, सुसंगत आणि सर्जनशील बनवू शकतो.काही AI टूल्स संपूर्ण लेख तयार करू शकतात—ब्लॉग पोस्ट, निबंध, जाहिरात मजकूर इत्यादी. अर्थात, अंतिम संपादन मानवास करावं लागतं.

ब. भाषांतर : गुगल ट्रान्सलेट, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ट्रान्सलेटर्स यामुळे इंग्रजीमराठी भाषांतर सहज झाले आहे. यामुळे जागतिक साहित्य मराठीत आणणे सोपे झाले आहे. नैसर्गिक भाषा प्रक्रिया वापरून AI विविध भाषांमधील साहित्याचे अचूक भाषांतर करू शकते. त्यामुळे स्थानिक साहित्य जागतिक स्तरावर पोहोचू शकते. स्वयंचलित भाषांतर, नैसर्गिक भाषा प्रक्रिया, वैयक्तिकृत भाषांतर, व्हॉइस भाषांतर, चित्र व व्हिडिओ भाषांतर हे AI च्या माध्यमामुळे सोपे झाले आहे. प्रवासात किंवा आंतरराष्ट्रीय बैठकीत AI उपयुक्त ठरते.

क. साहित्य विश्लेषण : डेटा विश्लेषणाच्या साहाय्याने साहित्यिक प्रवाह, शैली, विषय, भाषेतील बदल, लेखकांचे योगदान यांचा अभ्यास शक्य झाला आहे. विशिष्ट लेखकाच्या सर्व रचनांचे विश्लेषण करता येते. AI भावनात्मक विश्लेषण करून साहित्यिक पात्रांच्या मनोवृत्ती समजून घेण्यास मदत करतो. सांस्कृतिक संदर्भ ओळखून विश्लेषण अधिक सखोल करता येते. मोठ्या प्रमाणावर ग्रंथसंपदा स्कॅन करून तुलनात्मक अभ्यास करता येतो.

अशा प्रकारे मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा समन्वय साधता येतो.

## फायदे आणि तोटे:

### फायदे

1. ईबुक्स, ऑडिओबुक्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे मराठी साहित्य आता जगभरातील वाचक मराठी साहित्य सहज वाचू शकतात. तंत्रज्ञानामुळे नवोदित लेखकांना प्रसिद्धी मिळवणे सोपे झाले आहे.
2. पर्यावरणपूरक आणि खर्चविरहित डिजिटल साहित्यामुळे कागदाचा वापर कमी होतो, वितरण खर्चही वाचतो.
3. शिकण्याची गती वाढते AI आधारित ॲप्समुळे व्याकरण, उच्चार आणि वाचन कौशल्य सुधारता येते.
4. मराठी साहित्याचे शिक्षण आता ईलर्निंग, व्हिडिओ लेक्चर्स, डिजिटल नोट्स यांद्वारे दिले जाते.
5. नवोदित लेखकांना मार्गदर्शन मिळते आणि विविध भाषांमधील साहित्य सहज उपलब्ध होईल

### तोटे

1. कॉपीराइट आणि पायरसी डिजिटल स्वरूपात साहित्य सहज कॉपी करता येते, त्यामुळे लेखकांचे हक्क धोक्यात येतात.
2. सर्वच डिजिटल साहित्य दर्जेदार नसते. कोणीही साहित्य प्रकाशित करू शकते, त्यामुळे दर्जा राखणे कठीण होते. कॉपीपेस्टमुळे सर्जनशीलतेचा अभाव.
3. मोबाइल, सोशल मीडिया आणि सततच्या नोटिफिकेशन्समुळे वाचनात व्यत्यय येऊन वाचनाची एकाग्रता कमी होते
4. ज्येष्ठ वाचक अजूनही पारंपरिक पुस्तकांना प्राधान्य देतात, त्यामुळे डिजिटल साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात अडचणी येतात.
5. सर्जनशीलतेवर प्रश्न, साहित्यिक बेरोजगारीचा धोका आणि साहित्याच्या नैतिकतेवर परिणाम होऊ शकतो.

## निष्कर्ष

मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम हा काळाची गरज बनली आहे. तंत्रज्ञानामुळे साहित्य अधिक लोकांपर्यंत पोहोचत आहे, नव्या अभिव्यक्तीच्या वाटा खुल्या होत आहेत. मात्र, दर्जा, मौलिकता आणि सांस्कृतिक मूल्ये जपणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते, आणि तंत्रज्ञान हे त्या आरशाला अधिक स्पष्ट बनवते. मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम हा काळाच्या गरजेनुसार घडलेला एक महत्त्वाचा बदल आहे. पारंपरिक साहित्य हे भावनांचे, संस्कृतीचे आणि विचारांचे प्रतिबिंब असते, तर आधुनिक तंत्रज्ञान हे त्या साहित्याच्या प्रसाराचे प्रभावी माध्यम बनले आहे. आज ईपुस्तके, ऑडिओबुक्स, ब्लॉग्स, पॉडकास्ट्स आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून मराठी साहित्य अधिक व्यापक प्रमाणात वाचकांपर्यंत पोहोचत आहे. लेखक आणि कवी आता डिजिटल प्लॅटफॉर्मवरून थेट वाचकांशी संवाद साधू शकतात. साहित्य संमेलने, चर्चासत्रे आणि कार्यशाळा ऑनलाइन होत आहेत, ज्यामुळे ग्रामीण भागातील साहित्यप्रेमींनाही सहभाग घेता येतो. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भाषांतर तंत्रज्ञानामुळे मराठी साहित्य जागतिक स्तरावर पोहोचण्याची संधी निर्माण झाली आहे. या सगळया बदलांमुळे साहित्याची अभिव्यक्ती अधिक सर्जनशील, संवादात्मक आणि समावेशक झाली आहे. तंत्रज्ञान हे साहित्याच्या आत्म्याला धक्का न लावता त्याला नवसंजीवनी देत आहे. त्यामुळे मराठी साहित्याचे भवितव्य हे उज्ज्वल आणि काळानुरूप विकसित होत आहे.

## Reference Books:


1. डा. नंदकुमार मोरे मराठी भाषा माहिती आणि तंत्रज्ञान, यशवंतराव चव्हण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. मे २०२३
2. विनोद जैतमल समाज माध्यमांतील लेखनकौशल्ये सोशल मीडियावरील बदलते लेखनविश्व साकेत प्रकाशन, छ.संभाजीनगर, प्र. आ. २०२४
3. मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे – तंत्रज्ञान सेवा.
4. राज्य मराठी विकास संस्था ग्रंथालय (2020).
5. साहित्याचा सामाजिक संदर्भ WeeklySadhana.in.
6. साहित्य निर्मिती व वितरणातील तांत्रिक बदल KshitijPatukale.com.
7. वैज्ञानिक व तांत्रिक संदर्भ साहित्य मराठी विश्वकोश.
8. साहित्य प्रकार आणि समीक्षा मराठी विश्वकोश.
9. Joshi, Raviraj : Marathi Monolingual Corpus, Marathi BERT Language Models, and Resources, 2022
10. Magdum, Vidula : A Marathi Natural Language Processing Library, 2023
11. Dani, Asang; Sathe, Shailesh R. . A Review of the Marathi Natural Language Processing, 2024
12. Joshi, Raviraj L3Cube MahaNLP: Marathi Natural Language Processing Datasets, Models, and Library, 2022
13. Sonawane Patil, Kalpna; Patil, Pradip : Granthalaya Ani Mahitishastra, Prashant Publications, 2022


**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.